लघु पाटबंधारे तलाव महिंद, ता. पाटण, जि. सातारा येथील सांडवा व पुच्छ कालवा मजबूतीकरणाचा विस्तार व सुधारणाअंतर्गत विशेष दुरुस्ती प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१६/ (प्र.क्र.२३९/२०१६)/ सिं.व्य.(कामे)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०७. ०३.२०१८.

वाचा :- कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र -

१. जा.क्र. मकृखोविम/(२/१६४/२०१६)/प्रशा-५/१२६९/सन २०१६, दि.०२.०४.२०१६
२. जा.क्र. मकृखोविम/(१६/(५४०/२०१५)/४१७६)/सन २०१६, दि. २५.१०.२०१६
३. जा.क्र. मकृखोविम/(०२/(१६४/२०१६)प्रशा-५/४४३१, दि. १५.११.२०१६
४. जा.क्र. मकृखोविम/(०२/(५९७/२०१६)प्रशा-४/१४३७, दि. ०७.०४.२०१७
५. जा.क्र. मकृखोविम/(०२/(१६४/२०१६)प्रशा-५/२३५५, दि. १२.०६.२०१७
६. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/(२७/२०१६)/लपा-०२, दि. २६.०५.२०१६

प्रस्तावना :-

सदर लघु पाटबंधारे तलाव मौजे महिंद, ता पाटण हा प्रकल्प उत्तर वांग नदीवर येत असून प्रकल्पाची जागा महिंद गावापासून १.०० कि.मी. अंतरावर वरील बाजूस आहे. सदर प्रकल्प हा माती धरणाचा आहे व धरणाची लांबी ४८४ मी. असून धरणाची महत्तम उंची २१.३२ मी. आहे. सांडवा हा मुख्य पतन पध्दतीचा असून १०४ मी. लांबीचा आहे. ल.पा. तलाव महिंद या प्रकल्पाचे काम सन २००० साली पूर्ण झालेले असून सद्यस्थितीत प्रकल्पाचा पाणीसाठा व त्याखाली असणारे ४ को. प. बंधारे सिंचन व्यवस्थापनासाठी धोम पाटबंधारे विभाग, सातारा या कार्यालयास सन २००४ साली हस्तांतरीत करणेत आलेले आहेत व त्याचा लाभ साधारणपणे ३०४ हे. इतक्या सिंचन क्षेत्रास होत आहे. सदर विशेष दुरुस्ती कामांमुळे प्रत्यक्ष सिंचनामध्ये कोणतेही वाढ होत नाही. धरणाच्या सांडव्याव्दारे होणाऱ्या गळतीमुळे पाणी वाया जाऊन निर्मित सिंचन क्षेत्रावर परिणाम होत आहे तथापि सदर विशेष दुरुस्ती कामांमुळे धरणाच्या सांडवा गळतीमुळे वाया जाणाऱ्या पाण्यास प्रतिबंध करुन पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करणे भौतिकदृष्ट्या शक्य होणार आहे. त्यामुळे निश्चितपणे निर्मित ३०४ हे. सिंचन क्षेत्रास व पिण्याच्या पाण्याच्या पाण्यासाठी देखील पुरेसे पाणी उपलब्ध होणार आहे. सदर कामाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, पाणी वापरसंस्थेने व लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी केलेली होती याअनुषंगाने संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये विभागास देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर दुरूस्तीच्या कामाकरीता विशेष दुरूस्ती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

लघु पाटबंधारे तलाव महिंद, ता. पाटण, जि. सातारा येथील सांडवा व पुच्छ कालवा मजबूतीकरणाचा विस्तार व सुधारणाअंतर्गत या कामाच्या विशेष दुरूस्तीच्या कामांसाठी विशेष दुरूस्ती अंतर्गत संदर्भ क्र. १.२.३.४.५ येथील पत्रान्वये प्रस्तावित कामांच्या रू. **७७,१५,८४१/-** व अनुषंगिक खर्च

रू. ७७,१५,८४/- अशा एकूण रू. **८४,८७,४२५/**- (रू.चौऱ्यांऐंशी लक्ष सत्याऐंशी हजार चारशे पंचवीस फक्त) एवढ्या खर्चाच्या प्रस्तावास संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये विभागास दिलेल्या अधिकारान्वये व आंतरवित्त सल्लागार तथा उप सचिव यांच्या सहमतीने खालील अटींच्या अधीन राहून सोबतच्या प्रपत्रानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. शासन परिपत्रक क्र.प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिं.व्य.(कामे), दि.१.०१.२०१५ मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे, अभिलेखे ठेवणे व कार्यवाही करणे महामंडळावर बंधनकारक आहे.
२. शासन पत्र दि.४/०६/२०१६ अन्वये तपासणी सूचीतील मुद्दे, आर्थिक निकष मा. राज्यपाल यांच्या निदेशानुसार २% मर्यादेत निधी खर्च करणे, दायित्व निर्मिती मर्यादेत राहण्यासाठी कामाचे दोन वर्षाचे नियोजन करणे याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची असेल.
३. यांत्रिकी विभागाकडून कामे करुन घेण्याबाबत प्रचलित शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करावी.
४. सदर अंदाजपत्रकात वस्तू व सेवा कराची तरतूद करण्यात आलेली नाही. तरी याबाबत महामंडळ स्तरावरुन पुढील निर्णय घ्यावा.
५. अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे/संकल्पने दरसूची बाहयबाबी व वहन अंतरे तपासून अंदाजपत्रकास सक्षमस्तरावर तांत्रिक मान्यता प्रदान करावी.
६. प्रकल्पावरील पाणी वापर संस्थेकडे संपूर्ण लाभक्षेत्र हस्तांतरण नियोजनाचे काम सुरु करण्यापूर्वी कामे पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरण करण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची असेल.
७. माती कामे व गवत झाडे/झुडपे काढण्याची कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध मशिनरीने करावीत .
८. प्रस्तावीत कामांमुळे खोदकामातून उपलब्ध होणारे बांधकाम साहित्याचा पूर्णवापर करुन बचत साधावी.
९. कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावा.
१०. सदरच्या कामांचा कार्यारंभ आदेश काढण्यापासून कामे पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास त्वरीत उपलब्ध करून द्यावे.

या कामावर होणारा खर्च ४७०२ लघु पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, १९०, सार्वजनिक व इतर उपक्रमातील गुंतवणूका (१०) उर्वरीत महाराष्ट्र (१०) (०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाला भागभांडवली अंशदान (विस्तार व सुधारणा) (उर्वरित महाराष्ट्र) (४७०२ ७४५२) या लेखाशीर्षाखाली करावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिं.व्य.(कामे) कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये क्र. ३९ सन २०१७-१८ मध्ये नोंदविण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०७१६३१२३७२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2018.03.07 16:33:58 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

सोबत: परिशिष्ट - अ

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा,मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन, मुंबई,
६) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद ,मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
७) मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
८) मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१०) सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर,
१३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे,
१४) मुख्य अभियंता, विप्र, जलसंपदा विभाग, पुणे.
१५) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१६) अधीक्षक अभियंता , सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली.
१७) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सातारा.
१८) सिं.व्य.(कामे) कार्यासन संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१६/ (प्र.क्र.२३९/२०१६)/ सिं.व्य.(कामे) दि. ०७/०३ /२०१८ चे सहपत्र

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रु.
१.	constructing Jacketing for १०४ m length of Waste Weir Bar	४१,९५,३८२.००/-
२.	Constructing Check Wall in Tail Channel	२८,७६,२५९.००/-
३	Embankment At Service Gate	५६,६४५.००/-
४	Pitching	५,८७,५५५.००/-
	Total	७७,१५,८४१.००/-
	ETP १०%	७,७१,५८४.००/-
	Grand Total	**८४,८७,४२५.००/-**

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2018.03.07 16:34:16 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव